नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 08/08/2023 (मंगळवार) सकाळ

---

## बुट्टीबोरी येथे बनावट देशी दारू बनविण्याचे कारखान्यावर धाड
## ५४ लाखांच्या मुद्देमालासह ११ आरोपी गजाआड
## स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीणची कारवाई

दिनांक ०८/०८/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नागपूर उपविभागात पेट्रोलींग करित असतांना मौजा बोरखेडी गावाजवळ विश्वसनिय मुखबीर कडुन खात्रीशीर खबर मिळाली की, ब्राम्हणी शिवारात सतीश तिजारे हा इसम त्यांचे शेतातील पोल्ट्रीफॉर्मचे आडमध्ये अवैधरित्या, बिनापरवाना देशी दारू बनविण्याचा कारखाना चालवुन, बनावट देशीदारू तयार करून मोठया प्रमाणात बाहेर जिल्हयात विक्री करिता पाठविते अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून मौजा ब्राम्हणी शेत शिवारात सापळा रचून छापा टाकला असता **आरोपी नामे– १) अर्जुन शंकरसिंग राजपुत वय ५२ वर्ष रा. वार्ड क्र. ७८ जयसिंगपुरा यत्रमैल मार्ग वाटरहाउसचे मागे उज्जैन ह. मु. साई होटल एमआयडीसी बोरी, मशीन जवळ उभे असलेले ऑपरेटर २) योगेश सुभाष ब्राम्हणे, वय १९ वर्ष, रा. मोहीदा वार्ड क्र. ८ शांतीनगर जि. बडवाणी (मध्यप्रदेश) ३) अनिल थानसिंग डावर, वय २३ वर्ष, रा. मोहीदा वार्ड क्र. ८ शांतीनगर जि. बडवाणी (मध्यप्रदेश), बॉक्स मध्ये शिश्या भरून बॉक्स तयार करणारे ४) अर्जुन भोगी ब्राम्हणे, वय १९ वर्ष रा. मोहीदा वार्ड क्र. ८ शांतीनगर जि. बडवाणी (मध्यप्रदेश) ५) अरविंद सुभाष ब्राम्हणे, वय १९ वर्ष रा.मोहीदा वार्ड क्र. ८ शांतीनगर जि. बडवाणी (मध्यप्रदेश) ६) गणेश चिंदा जाधव वय २५ वर्ष रा. मोहीदा वार्ड क्र. ८ शांतीनगर जि. बडवाणी (मध्यप्रदेश) ७) दिपक महारिया ब्राम्हणे वय २५ वर्ष रा. मोहीदा वार्ड क्र.८ शांतीनगर जि.बडवाणी (मध्यप्रदेश), लहान प्लॅस्टीक शिश्यामध्ये द्रवपदार्थ भरणारे इसम ८) राहुल सुरेश जाधव वय २२ वर्ष रा.मोहीदा वार्ड क्र. ८ शांतीनगर जि. बडवाणी (मध्यप्रदेश) ९) विशाल राजु परमार वय २५ वर्ष रा. मोहीदा वार्ड क्र. ८ शांतीनगर जि. बडवाणी (मध्यप्रदेश) ह. मु. ब्राम्हणी ता. जि. नागपुर ग्रा. सुरेश तिजारेचे घरी, मालवाहु गाडीचा ड्रायव्हर १०) साहेबराव मधुकरराव पाटील वय ४२ वर्ष रा. बोरवीर धुळे औरगांबाद रोड ता. जि. धुळे ह. मु. हनुमान मंदीर जवळ शिरूळ सातगाव ता. हिंगणा जि. नागपुर** व शेतमालक सतिश तिजारे असे एकुण ११ आरोपी कोणताही परवाना नसतांना नकली देशी दारू तयार करणेकरीता कारखाना तयार करून त्यामध्ये बनावट नकली देशी दारू तयार करून त्यावर नामांकित कंपनीचे बोगस लेबल लावुन तसेच दारूची वाहतुक करण्यासाठी परिवहनाकरिता मालवाहू गाडीत भरतांना मिळुन आले. आरोपीतांजवळुन नकली देशी दारू बनविण्यासाठी वापरण्यात येणारे रसायन, पॅकेजिंग करणारी मशीन, बनावट लेबल, फ्लेवर बॉटल, देशी दारू, वाहने व इतर साहित्य असा एकूण ५४४८५९२/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपीतांविरूद्ध कलम ३२८, ४२०, ४६७, ४७१, ३४ भादंवि सहकलम ६५ A, B, C, D, E, F, ६७(१), A, ६७(C), ७२, ८३, ८६, ९० प्रोबिशन ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदवुन आरोपीतास जप्त मुद्देमालासह पुढील कायदेशीर कार्यवाही करीता पोलीस ठाणे बुट्टीबोरी यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक श्री. डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात, परि. पोलीस अधिक्षक तथा प्रभारी ठाणेदार पोलीस स्टेशन कुही श्री. अनिल मस्के, परिविक्षाधीन पोलीस उप अधिक्षक राहुल झालटे, पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस हवालदार मिलींद नांदुरकर, अरविंद भगत, मयुर ढेकळे, पोलीस नायक रोहन डाखोरे, अमृत किनगे, सतिश

राठोड, पोलीस शिपाई राकेश तालेवार, निलेश इंगुलकर, राहुल साबळे, चालक पोलीस शिपाई सुमित बांगडे यांचे पथकाने केली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर